**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र: व.वि.श.म./ / /२५-२६**
**दिनांक : 20/08/2025**

# वसई विरार शहर महानगरपालिका

अतिवृष्टी पार्श्वभूमीवर करावयाच्या उपाययोजनांबाबत मा.आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न-अधिकाऱ्यांना दिल्या विशेष सूचना

आज दि.२०/०८/२०२५ रोजी मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सर्व मनपा अधिकारी, विभाग प्रमुख यांचे सोबत दि.१९ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीशी संबंधीत विविध बाबींविषयी आढावा बैठक घेण्यात आली.

दि.१९ ऑगस्ट रोजी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे पाणी साचलेली ठिकाणे व तेथे करण्यात आलेल्या सर्व उपाययोजनांचा प्रभागनिहाय आढावा यावेळी घेण्यात आला.

ज्या ठिकाणी अजूनही पाणी साचून राहिले आहे तेथे संक्शन पंपाद्वारे पाणी काढून घेणे, रस्त्यावरील मॅनहोल स्वच्छ करणे,मॅनहोल उघडले असल्यास नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने योग्य दक्षता घेणे,पाण्याचा निचरा लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे तसेच पाणी साचल्यामुळे अडकलेल्या नागरिकांची सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविणेच्या सूचना यावेळी मा.आयुक्त महोदयांनी प्रभाग अधिकाऱ्यांना दिल्या.

ज्या नागरिकांना मनपाच्या तात्पुरत्या निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आले आहे किंवा येत आहे त्यांची त्याचप्रमाणे ज्या नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे त्यांच्या मागणीनुसार त्यांच्या जेवणाची, पिण्याच्या पाण्याची तसेच राहण्याची सोय करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

या काळात मनपा क्षेत्रात दूषित पाणीपुरठा होवू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करून स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा करण्याच्या सूचना पाणीपुरवठा विभागात देण्यात आल्या. पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांच्या स्वच्छतेसाठी पाणीपुरवठा विभागामार्फत विविध सोसायट्यांच्या पाण्याच्या टाक्यांमध्ये ब्लिचिंग पावडर टाकून पाणी स्वच्छ करण्याच्या सूचनाही विभागास देण्यात आल्या.

त्याचप्रमाणे दरड प्रवण क्षेत्र,धोकादायक इमारती,घरे इ.असलेल्या ठिकाणी वेळोवेळी जावून पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करणे,तेथील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करणे बाबतच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

अतिवृष्टीमुळे आरोग्याच्या कोणत्याही समस्या शहरात निर्माण होवू नये यासाठी पाणी ओसरल्यानंतर शहरात वेळीच स्वच्छता करून जंतूनाशक औषधे फवारणी करण्याच्या,तसेच साथींचे आजार उदभवू नयेत यासाठी शहरात आवश्यक त्या सर्व ठिकाणी तातडीने वैद्यकीय कॅम्पचे आयोजन करण्याच्या सूचना मा.आयुक्त महोदयांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

सर्व मनपा अधिकारी व कर्मचारी यांनी अतिवृष्टीच्या काळात नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही यादृष्टीने सदैव तत्पर राहून दिलेल्या जबाबदरया योग्यरीतीने पार पाडण्याच्या सुचना यावेळी मा.आयुक्त महोदयांनी दिली.

या बैठकीस मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत, मनपाचे सर्व उपआयुक्त, प्र.शहर अभियंता, सर्व सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, मुख्य वैद्यकीय अधिकारी, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.